सत्यमेव जयते

# महाराष्ट्र विधानमंडळ

# सार्वजनिक उपक्रम समिती

## २०१५-२०१६

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्र शासनाच्या सन २००९-२०१० व २०११-१२ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१६ (२००९-१०) व परिच्छेद क्रमांक ३.२१ (२०११-१२) तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २००९-२०१० च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१७ यावरील समितीचा**

# पाचवा अहवाल

(दिनांक १६ डिसेंबर २०१५ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर केला.)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

विधान भवन, मुंबई/नागपूर

२०१५

[किंमत : २४.०० रुपये]

# सार्वजनिक उपक्रम समिती

२०१५-२०१६

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्र शासनाच्या सन २००९-२०१० व २०११-१२ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१६ (२००९-१०) व परिच्छेद क्रमांक ३.२१ (२०११-१२) तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २००९-२०१० च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१७ यावरील समितीचा

# पाचवा अहवाल

# सार्वजनिक उपक्रम समिती

(सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख**

१. डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

**सदस्य**

२. * रिक्त

३. श्री. भिमराव धोंडे, वि.स.स.

४. श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

५. डॉ. आशिष देशमुख, वि.स.स.

६. ॲड. आकाश फुंडकर, वि.स.स.

७. श्री. द्वारम मल्लीकार्जून रेड्डी, वि.स.स.

८. श्री. अमित साटम, वि.स.स.

९. श्री. राजन साळवी, वि.स.स.

१०. श्री. हर्षवर्धन जाधव, वि.स.स.

११. श्री. सुनिल राऊत, वि.स.स.

१२. श्री. मनोहर भोईर, वि.स.स.

१३. श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

१४. ॲड. यशोमती ठाकूर, वि.स.स.

१५. श्री. भारत भालके, वि.स.स.

१६. श्री. पंकज भुजबळ, वि.स.स.

१७. श्री. हनुमंत डोळस, वि.स.स

१८. श्री. मकरंद जाधव-पाटील, वि.स.स

१९. श्री. हितेंद्र ठाकूर, वि.स.स.

२०. श्री. बळीराम सिरसकर, वि.स.स.

२१. ॲड. अनिल परब, वि.प.स.

२२. श्री. किरण पावसकर, वि.प.स.

२३. श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स.

२४. श्री. अनंत गाडगीळ, वि.प.स.

२५. श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,

(२) श्री. राजेश तारवी, उप सचिव,

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव,

(४) श्री. प्र. स. मयेकर, अवर सचिव (समिती),

(५) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी.

* ॲड. राज पुरोहित, वि.स.स. यांनी दिनांक २६ ऑगष्ट २०१५ रोजी सार्वजनिक उपक्रम समिती वरील सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे सदर जागा रिक्त आहे.

# अनुक्रमणिका


| अनुक्रमांक (१) | विषय (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| | प्रस्तावना | |
| एक | " महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ "<br>(लेखा परीक्षा अहवाल २००९-२०१०)<br>(१) विलंबाने केलेल्या कारवाईमुळे वित्तीय नुकसान<br>(परिच्छेद क्रमांक ३.१६) | १ |
| दोन | " महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ "<br>(लेखा परीक्षा अहवाल २०११-२०१२)<br>(२) भाडेपट्ट्याला अंतिमरुप देण्यामध्ये विलंब<br>(परिच्छेद क्रमांक ३.२१) | ७ |
| तीन | " महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ "<br>(लेखा परीक्षा अहवाल २००९-२०१०)<br>(३) सेवा कराची कमी वसुली<br>(परिच्छेद क्रमांक ३.१७) | १५ |
| चार | बैठकीचे परिशिष्ट | २३ |

## प्रस्तावना

मी, सार्वजनिक उपक्रम समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरून महाराष्ट्र शासनाच्या सन २००९-२०१० व २०११-२०१२ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्र. ३.१६ (२००९-१०) व ३.२१ (२०११-१२) तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २००९-२०१० च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्र. ३.१७ यावरील समितीचा पाचवा अहवाल (तेरावी महाराष्ट्र विधानसभा) सादर करीत आहे.

" महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ " यांच्याकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनावर उद्योग विभागाचे प्रधान सचिव, श्री. अपूर्व चंद्रा तसेच इतर अधिकारी यांची समितीने दिनांक ३० सप्टेंबर २०१५ रोजी साक्ष नोंदवून घेतली.

" महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ " यांच्याकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनावर परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव, श्री. गौतम चटर्जी तसेच " महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे " उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, श्री. संजय खंदारे यांची समितीने दिनांक ८ सप्टेंबर २०१५ रोजी साक्ष नोंदवून घेतली.

श्रीमती संगीता चौरे, प्रधान महालेखाकार (लेखा III), यांनी निमंत्रणानुसार समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला केलेल्या मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांचे आभार मानते. तसेच उद्योग विभागाचे प्रधान सचिव, श्री. अपूर्व चंद्रा व इतर अधिकारी तसेच परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव, श्री. गौतम चटर्जी तसेच " महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे " उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, श्री. संजय खंदारे यांनी समितीला दिलेल्या संपूर्ण सहकार्याबद्दल समिती त्यांचे आभार मानते.

समितीने मंगळवार, दिनांक २४ नोव्हेंबर, २०१५ रोजी झालेल्या बैठकीत या अहवालावर विचार करून तो काही सुधारणांसह संमत केला.

विधान भवन :<br>मुंबई,<br>दिनांक : २४ नोव्हेंबर २०१५.

डॉ. सुनिल देशमुख,<br>समिती प्रमुख,<br>सार्वजनिक उपक्रम समिती.

# महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ

(सन २००९-२०१०)

**एक-विलंबाने केलेल्या कारवाईमुळे वित्तीय नुकसान .— (थकबाकी वसुलीसाठी उपलब्ध तारणांची विक्री करण्यात दिरंगाई झाल्याने महामंडळास रुपये १.३१ कोटीचे नुकसान झाले.)**

**१.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००९-१० च्या प्रकरण क्रमांक ३ मधील परिच्छेद क्रमांक ३.१६- मध्ये **" विलबांने केलेल्या कारवाईमुळे वित्तीय नुकसान "** या संदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले होते की, विविध प्रकारच्या नॉन फेरस मेटलची निर्मिती करणाऱ्या मुंबई स्थित मारडीया एक्स्ट्रजन लिमिटेड (संस्था) ने महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाकडे (महामंडळ) कारखान्याच्या विस्तारीकरणासाठी खेळते भांडवल म्हणून तात्पुरत्या लघु मुदतीचे रुपये २.४० कोटीचे कर्ज मंजूर करण्याची विनंती केली (७ नोव्हेंबर १९९५).

महामंडळाने संस्थेच्या अतिरिक्त खेळत्या भांडवलाच्या गरजा भागविण्यासाठी रुपये २.०० कोटीचे लघु मुदतीचे कर्ज मंजूर (नोव्हेंबर,१९९५) व वितरित (डिसेंबर,१९९५) केले. सदरहू कर्ज, कर्जफेड पुढे ढकलण्याच्या तीन महिन्यांच्या कालावधी (मोरॅटोरियम पीरीयड) सहित एकूण ११ मासिक हप्त्यात फेडावयाचे असून त्यावर २३ टक्के व्याज आकारण्यात येणार होते. सदरहू लघु मुदतीच्या कर्जाच्या तारणापोटी संस्थेने त्यांचे व त्यांच्या सहाय्यक संस्थांचे (२४.७४ लाख शेअर्स) ज्यांचे त्यावेळेचे बाजारमूल्य रुपये ४.०० कोटी होते ते समभाग गहाण ठेवले होते. तसेच दोन संचालकांकडून वैयक्तिक हमी पण घेण्यात आली होती.

संस्था सुरूवातीपासुनच कसूरदार होती व रुपये २५.०० लाखांचा पुढील तारखेचा (२० जुलै १९९६) धनादेश बँकेकडून अनादर होऊन २४ जुलै १९९६ रोजी परत आला. मार्च १९९७ पर्यंत संस्थेने मुद्दलापोटी फक्त रुपये ८.९८ लाख भरले होते. त्यानंतर संस्थेने पुन्हा कधीही कर्जफेड केली नाही. ३१ डिसेंबर २००६ रोजी संस्थेकडून रुपये ४.२३ कोटीची रक्कम वसूल करणे बाकी होते (मुद्दल रुपये १.९१ कोटी व व्याज : रुपये २.३२ कोटी). लेखापरीक्षणात असे दिसून (एप्रिल २००९) आले की, जुलै १९९६ मध्ये बँकेकडून अनादर होऊन धनादेश परत आल्यानंतर महामंडळाने परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ च्या कलम १३८ अंतर्गत कर्जदारावर कारवाई केली नाही व थकबाकी वसुलीसाठी तारण ठेवलेले समभाग विकले देखील नाहीत. संचालकांनी दिलेली वैयक्तिक

हमी अंमलात आणण्यात पण महामंडळाने कसूर केली. याचा फायदा घेऊन दोन्ही संचालकांनी त्यांची संपत्ती पती / पत्नीच्या व त्यांच्या वेगळया असलेल्या संस्थेच्या नावावर १९९८ मध्ये हस्तांतरित केली होती.

महामंडळाने, मुंबई उच्च न्यायालयात अर्ज दाखल केला (१९९७) तसेच ठाणे जिल्हा न्यायालयात १९९९ मध्ये राज्य वित्तीय महामंडळ कायद्याच्या कलम ३१ (१) (अअ) अन्वये अर्ज दाखल केला. महामंडळाने न्यायालयात दाखल केलेल्या अर्जाला न्यायालयाने बेमुदत स्थगिती (साईने डाय) दिली कारण कसुरदार संस्थेने २००१-२००४ मध्ये माननीय औद्योगिक व आर्थिक पुनर्रचना मंडळाकडे (बीआयएफआर) वारंवार अर्ज केला होता. महामंडळाने १८ जुलै २००८ रोजी (१९९७ पासून ११ वर्षाचा कालावधी लोटल्यानंतर) त्यांच्याकडे तारण म्हणून ठेवलेल्या समभागांच्या विक्रीसाठी जाहिरात दिली. समभागांचे मूल्य शून्य असल्याने जाहिरातीस काहीच प्रतिसाद मिळाला नाही. अशाप्रकारे, सुरूवातीच्या काळात महामंडळाकडून तारण विक्रीत केलेल्या विलंबामुळे महामंडळास संस्थेने दिलेली रुपये ६०.०० लाखांची वन टाईम सेटलमेंट मान्य करावी लागली (ऑगस्ट, २००८) त्यामुळे रुपये १.३१ कोटीचे मुद्दल व रुपये २.३२ कोटीच्या व्याजास मुकावे लागले.

व्यवस्थापनाने आपल्या उत्तरात (मे, २०१०) ज्यास शासनाने सहमती दर्शविली होती असे म्हटले (ऑगस्ट, २०१०) होते की, कर्ज अल्प मुदतीचे असल्याने संस्थेच्या समभागाशिवाय अन्य तारण घेण्यात आले नव्हते. संस्थेची शेअर बाजारात नोंदणी झालेली होती परंतु संस्था विविध कारणांमुळे नुकसानीत गेली व बीआयएफआरकडे तिचे प्रकरण वर्ग करण्यात आले होते. संचालक मंडळाने तारण व हमीची उपलब्धता ध्यानात घेऊन प्राप्त परिस्थितीमध्ये संस्थेने दिलेली एक वेळची तडजोड (ओटीएस) ऑफर स्वीकारण्याचा सर्वोत्तम निर्णय घेतला. उत्तरामध्ये धनादेशाचा अनादर झाल्यानंतर ताबडतोब कारवाई न करण्याची कारणे सांगितलेली नाहीत, तसेच जेव्हा तारण म्हणून दिलेल्या समभागांची किंमत शून्य झाली होती त्यावेळी १० वर्षे दिरंगाईने कारवाई करण्याच्या कारणांचा उहापोह केलेला नाही. त्यामुळे संस्थेने रुपये ६०.०० लाखांची देऊ केलेली एक वेळची तडजोड रक्कम स्वीकारण्याखेरीज महामंडळास पर्याय नव्हता. म्हणून शिफारस करण्यात येते की, आर्थिक नुकसान टाळण्यासाठी महामंडळाने सावध राहिले पाहिजे व आपले घेणे वसुलीसाठी कर्जदाराने दिलेल्या तारण हमीच्या विक्रीची अंमलबजावणी करावी.

१.२ या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले आहे की, धनादेश बँकेकडून दिनांक २४ जुलै १९९६ रोजी न वटता परत आल्यावर सदर संस्थेचे मुख्य प्रवर्तक श्री. मारडीया यांनी दिनांक १६ ऑगस्ट १९९६ रोजी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांची भेट घेऊन रक्कम रुपये १०.०० लाख भरावयाचे मान्य करुन सदर रकमेचा धनादेश त्याच दिवशी जमा केला. श्री. मारडिया यांनी दिलेल्या वचनाप्रमाणे रक्कम अदा केल्यामुळे पराक्रम्य संलेख अधिनियमाच्या कलमाच्या १३८ अंतर्गत कारवाई केली नाही. या संदर्भात असे नमूद करावेसे वाटते की, कोणताही धनादेश बँकेकडून न वटता परत आल्यानंतर पराक्रम्य संलेख अधिनियम, १८८१ च्या कलम १३८ (ब) (NI Act) अंतर्गत कर्जदारावर कारवाई करण्याच्या दृष्टीने एक महिन्याच्या कालावधीची सूचना (नोटीस) जारी करावी लागते. प्राप्त प्रकरणामध्ये सदर उद्योगघटकाचे मुख्य प्रवर्तक श्री. मारडीया यांनी आश्वासन दिल्या प्रमाणे रक्कम रुपये १०.०० लाख भरणा केल्यामुळे कलम १३८ अंतर्गत कारवाई केली नाही. शिवाय उर्वरित येणे रकमेच्या वसुलीसाठी सदर संस्थेबरोबर वाटाघाटी चालू होत्या परंतु सदर संस्था याबाबतीत सहकार्य देत नसल्याचे निदर्शनास येताच जर महामंडळाची थकबाकी भरली नाही तर कर्ज वसुलीसाठी दावा दाखल करण्यात येईल असे महामंडळाच्या वकिलातर्फे १४ जुलै १९९७ रोजी नोटीस पाठवून सदर कंपनीस कळविण्यात आले होते. परंतु त्यानंतरसुद्धा सदर संस्थेकडून प्रतिसाद न मिळाल्याने व महामंडळ प्रतिभूती नसलेली ऋणको (Unsecured Creditor) असल्यामुळे महामंडळाने मुंबई उच्च न्यायालयात दिनांक २५ नोव्हेंबर १९९७ रोजी संस्थे विरुद्ध समापन दावा क्रमांक १०१५/१९९७ (Winding-up Petition) दाखल केला. त्यानंतर उच्च न्यायालयाच्या दिनांक १८ सप्टेंबर १९९८ रोजीच्या निर्णयानुसार संस्थेस चार महिन्यांच्या आत न्यायालयात रक्कम भरण्यास सांगितली पण कंपनी रक्कम भरु शकली नाही. त्यामुळे महामंडळाने राज्य वित्तीय महामंडळ अधिनियम, १९५१ च्या कलम ३१ (१) (अअ) अंतर्गत संचालकांनी दिलेली हमी आवाहनीत करुन कर्जदार / संचालक यांच्या विरोधात नोव्हेंबर, १९९९ मध्ये २४९/ १९९९ क्रमांकाचा दावा दाखल केला. त्यानंतर सदर कसूरदार संस्थेने मा.औद्योगिक व आर्थिक पुनर्रचना महामंडळाकडे सन २००१ मध्ये अर्ज केला व तो निर्णयासाठी प्रलंबित होता. न्यायालयीन कार्यवाहीस गती येण्यासाठी व कर्ज वसुलीसाठी महामंडळाने कलम ३१ (१)(अअ) व इतर कार्यवाही चालू ठेवण्यासाठी न्यायालयात दिनांक ३० नोव्हेंबर २००१ रोजी अर्ज दाखल केला होता. परंतु औद्योगिक व आर्थिक पुनर्रचना मंडळाकडे प्रकरण प्रलंबित असल्यामुळे मा.न्यायालयाने अर्जास बेमुदत स्थगिती (Sine Die) दिली.

यावरुन असे निदर्शनास येईल की, महामंडळ सदर कर्जदार संस्थेकडून येणे असलेल्या रकमेसाठी/ वसुलीसाठी सातत्याने पाठपुरावा करीत होते. येथे असे नमूद करावेसे वाटते की, महामंडळास

प्रारंभीच्या काळात उद्योगघटकाविरोधात कठोर कारवाई न करता त्यांच्या अडचणी लक्षात घेऊन त्यावर मात करण्यासाठी उद्योगघटकास संधी देणे आवश्यक होते. या प्रकरणात सर्व वाटाघाटी निष्फळ झाल्यानंतर लगेचच महामंडळाने राज्य वित्तीय महामंडळे अधिनियम, १९५१ च्या अंतर्गत कंपनीच्या व जामिनदाराच्या विरोधात कारवाई केली. लेखा तपासणीसानी काढलेली नुकसानाची रक्कम हि कल्पोकल्पित असून वस्तुस्थितीला धरुन नाही. नंतर या संस्थेच्या संदर्भात बरेच न्यायालयीन वाद चालू होते, त्यामुळे महामंडळाने प्राप्त परिस्थितीनुसार योग्य ती भूमिका घेतली आहे.लेखा तपासनीसांच्या सदर संस्थेच्या समभागाची विक्री का केली नाही या संदर्भात केलेल्या निर्दशनाबाबत असे नमूद करावेसे वाटते की, सदर कंपनीचे पुनर्रचनेसाठीचे प्रकरण औद्योगिक व आर्थिक पुनर्रचना मंडळाकडे न्यायप्रविष्ठ होते तसेच सदर संस्थेच्या समभागाची नोंदणी ऑक्टोबर, २००२ मध्ये काढून टाकल्याने समभागाची किंमत निरंक झाली होती. पुन्हा अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून लेखा तपासनीसांनी केलेल्या शिफारशीची महामंडळाने दखल घेतलेली आहे.

१.३ याप्रकरणी शासनाने असे मत व्यक्त केले की, महामंडळाने त्यांच्या अधिकार क्षेत्रात कर्ज मंजूर केले असल्याने यावर कोणताही शेरा नाही.

१.४ समितीला उद्योग विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ रोजी उद्योग विभागाचे प्रधान सचिव, व इतर अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी महालेखाकारांनी केलेल्या लेखापरीक्षणामधील परिच्छेद क्र. ३.१६ " विलंबाने केलेल्या कारवाईमुळे वित्तीय नुकसान " याबाबत विभागाच्या प्रतिनिधीनी नमूद केले की, विविध प्रकारच्या नॉन फेरस मेटलची निर्मिती करणाऱ्या मुंबईतील मारडीया एक्स्ट्रजन लिमिटेड यांना महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने रुपये २.०० कोटीचे लघु मुदतीचे कर्ज मंजूर केले होते. सदर लोन हे वैयक्तिक हमीवर देण्यात आले होते. तद्नंतर हे प्रकरण मा. न्यायालयात गेले आणि रुपये ६०.०० लाख इतक्या रकमेची एकाच वेळी तडजोड करण्यात आली.

त्यानुंषगाने समितीने विचारणा केली की, सदर कंपनी कोणाची होती, कोणत्या कारणासाठी कर्जाची मागणी करण्यात आली होती तसेच सदर कंपनी कुठे आहे, कर्ज घेताना वैयक्तिक हमी दिली होती ती महामंडळाने जप्त केली आहे काय, त्यानुषंगाने विभागाच्या प्रतिनिधींनी नमूद केले की, सदर कंपनी तारापूर येथे आहे. तेथे अधिकाऱ्यांना देखील पाठविले होते. त्यावेळी कळले की, तो कारखाना बंद आहे. सदर कंपनी ही श्री. मारडीया यांची होती. या कंपनीला देना बँक व युनियन बँक यांनी देखील कर्ज पुरवठा केला आहे. देना बँक यांनी ३ कोटी रूपये कर्ज दिले होते त्याच्या ऐवजी रुपये २६.०० लाख इतक्या रकमेवर तडजोड केली होती. महामंडळाने रुपये २.०० कोटीच्या ऐवजी

रुपये ६०.०० लाखावर तडजोड केली होती. नोव्हेंबर, १९९७ मध्ये सदर कंपनी विरूद्ध मुंबई उच्च न्यायालयात वाईंडिंग-अप याचिका दाखल करण्यात आली. परंतु, सदर कंपनीने सन २००१ मध्ये औद्योगिक व आर्थिक पुनर्रचना मंडळाकडे (BIFR) अर्ज केला. त्यानंतर सन २००८ मध्ये सदर कंपनी बरोबर एक वेळची तडजोड झाली होती. त्यासंदर्भात समितीने विचारणा केली की, सन १९९५ मध्ये मारडीया एक्स्ट्रूजन लि.कंपनीला महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने कर्ज मंजूर केले होते. सन १९९६ मध्ये सदर कंपनीने व्याज देणे देखील बंद केले होते. त्यावेळी कंपनीने महामंडळाकडे तारण ठेवलेल्या समभागाची विक्री का केली नाही, तसेच किती लोकांना लघु मुदतीचे कर्ज महामंडळामार्फत देण्यात आले आहे.

त्यानुषंगाने महामंडळाच्या प्रतिनिधींनी नमूद केले की, सदर प्रकरणी ऋणको विरोधात मा. न्यायालयामध्ये दावा दाखल करण्यात आला होता. कर्जाची परतफेड नियमित होत नसल्याने सन १९९७ मध्ये कारवाई करण्यात आली होती संकीर्ण याचिका मा. न्यायालयासमोर येण्याकरिता वेळ गेला होता. महामंडळाने एकूण ३७ लोकांना लघु मुदतीचे कर्ज दिले होते. त्यापैकी १५ लोकांनी खाते बंद केले असून १७-१८ लोकांकडून कर्ज वसुली येणे बाकी आहे. त्यासंदर्भात समितीने नमूद केले की, अशा प्रकरणी महामंडळाने तात्काळ निर्णय घेतला असता तर ११३० कोटी रुपयांची जबाबदारी आली नसती. समितीला दिलेल्या यादीमध्ये एका व्यक्तीकडून जवळपास ३ कोटी रुपये कर्ज वसुली येणे आहे, याबाबत महामंडळाचे म्हणणे काय आहे याबाबत महामंडळाने खुलासा करावा. त्यानुषंगाने महामंडळाच्या प्रतिनिधींनी नमूद केले की, बँका एनपीए झाला की व्याज थांबवतात परंतु महामंडळाकडे व्याज चालूच ठेवण्यात येते व महामंडळाचा व्याज दर २३ टक्के असून ५ टक्के दंडाचा दर आहे त्यामुळे खात्यावर रक्कम जास्त दिसते.

त्यासंदर्भात महालेखाकारांनी नमूद केले की, ज्यावेळी दीर्घ मुदतीचे कर्ज दिले जाते त्यावेळी अचल मालमत्ता सुरक्षित असते, कारखाना सुरक्षित असतो. याप्रकरणामध्ये २ कोटी रुपये भांडवल कंपनीला विस्तारीकरणासाठी दिले होते, अचल मालमत्ता संदर्भात न्यायालयामध्ये दावा दाखल करावयास पाहिजे होता. कंपनीच्या समभागाची किंमत भाग-भांडवल बाजारामध्ये किती होती यासंबंधी महामंडळाला काही माहिती नव्हती. त्यासंदर्भात महामंडळाच्या प्रतिनिधीनी नमूद केले की, कंपनी तोट्यात गेल्यामुळे युनियन बँकेने त्यांच्या २ कोटी ३४ लाख रुपयांच्या वसुली ऐवजी ३५ लाख रुपये घेतले, एनआयए बँकेने ११ कोटी रुपयांऐवजी फक्त २६ लाख रुपये कंपनीकडून घेऊन एक वेळची तडजोड केली होती. तसेच बँकेकडून कंपनीच्या व्यवहारासंबंधी सविस्तर माहिती प्राप्त झाल्यामुळे कंपनीला कर्ज मंजूर करण्यात आले होते. कर्ज वसुलीसाठी महामंडळाने न्यायालयात अर्ज दाखल केला होता. परंतु, औद्योगिक व आर्थिक पुनर्रचना महामंडळाकडे प्रकरण प्रलंबित असल्याने माननीय न्यायालयाने अर्जास बेमुदत स्थगिती दिली. त्यामुळे पुढे लवकर कार्यवाही होऊ शकली नाही.

## १.५ अभिप्राय व शिफारस :—

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी लेखा परिक्षणाच्या वेळी महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाच्या कामकाजासंदर्भात परिच्छेद क्र. ३.१६ " विलंबाने केलेल्या कारवाईमुळे वित्तीय नुकसान " या शिर्षकाखाली नोंदविलेल्या आक्षेपावर समितीने साक्ष घेतली साक्षीच्या वेळी असे आढळून आले की, थकबाकी वसुलीसाठी उपलब्ध तारणांची विक्री करण्यात दिरंगाई झाल्याने महामंडळास रुपये १.३१ कोटीचे नुकसान झाले. **महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने मुंबई येथील मारडीया एक्स्ट्रूजन लिमिटेड कंपनीला कारखान्याच्या विस्तारीकरणासाठी लघु मुदतीचे रुपये २.०० कोटीचे कर्ज मंजूर केले होते ही संस्था सुरूवातीपासून कसूरदार होती. मारडीया कंपनीने महामंडळास दिलेला धनादेश बँकेकडून अनादर होऊन परत आल्यानंतरही महामंडळाने कर्जदारावर कारवाई केली नाही व थकबाकी वसुलीसाठी तारण ठेवलेले समभाग विकले देखील नाहीत. संचालकांनी दिलेली वैयक्तिक हमी अंमलात आणण्यात पण महामंडळाने कसूर केला आहे.** याचा फायदा घेऊन दोन्ही संचालकांनी त्यांची संपत्ती पती / पत्नीच्या व त्यांच्या वेगळया असलेल्या संस्थेच्या नावावर १९९८ मध्ये हस्तांतरित केली होती. अशाप्रकारे, सुरूवातीच्या काळात **महामंडळाकडून तारण विक्रीत केलेल्या विलंबामुळे महामंडळास संस्थेने दिलेली रुपये ६०.०० लाखांची एकाच वेळची तडजोड मान्य करावी लागली. तसेच एसआयडीबीआयचे महामंडळाकडे रुपये २४५ कोटी आणि आयडीबीआयचे महामंडळाकडे रुपये ६४.९६ कोटी आहेत या सर्व रकमेचे व्याज व मूळ मुद्दल मिळून महामंडळाकडे एकूण रुपये ११३० कोटी थकीत आहेत, त्यामुळे एसआयडीबीआय व आयडीबीआय यांनी महामंडळाकडे शिल्लक असलेल्या रकमेबाबत तोडगा काढणे आवश्यक आहे.** तसेच महामंडळामार्फत सध्या कोणतीही नवीन कर्ज दिले जात नाही आता हे महामंडळ केवळ वसुलीकरिता मा.न्यायालयामध्ये गेलेले आहे या महामंडळाच्या वसुलीमधून महामंडळाकडे कार्यरत असणाऱ्या ३६ कर्मचारीवृंदाच्या वेतनाचा खर्च केला जात आहे. महामंडळातील अधिकारी/कर्मचारी यांना वसुली व्यतिरिक्त इतर कोणतेही काम नसताना त्यांच्या वेतनावर वार्षिक साडेसात कोटी रुपये इतका खर्च करावा लागत आहे, **महामंडळाची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे महामंडळाने कर्मचाऱ्यांसाठी स्वेच्छानिवृत्तीची योजना लागू करावी किंवा वसुलीसाठी कर्जदाराने दिलेल्या तारण हमीची विक्री अंमलबजावणी तात्काळ करावी व सदर महामंडळ बंद करण्याचा निर्णय घेण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे तसेच याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावी.**

## महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ

## (सन- २०११-२०१२)

**दोन - भाडेपट्ट्याला अंतिमरुप देण्यामध्ये विलंब :– (भाडेपट्टा कराराला अंतिमरुप देण्यात विलंब केल्यामुळे महामंडळाला रुपये ७४.१४ लाखाचे नुकसान झाले.)**

२.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०११-१२ च्या प्रकरण क्रमांक ३ मधील परिच्छेद क्रमांक ३.२१ मध्ये **“ भाडेपट्ट्याला अंतिमरुप देण्यामध्ये विलंब ”** या संदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले होते की, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने (महामंडळ) न्यू एक्सेल्सिअर बिल्डींग, मुंबई मधील ३,७०० चौ.फू. जागा ओमेगा शिपिंग एजन्सी प्रा. लि. (ओएसएपीएल) यांना ६६ महिन्यांच्या कालावधीसाठी म्हणजे जून २०१० पर्यंत रुपये ५२.०२ प्रति चौ. फू. दराने भाडेपट्ट्याने दिली होती (डिसेंबर,२००४) महामंडळाने ओएसएपीएल यांना रुपये २०० प्रति चौ.फू.या बाजारभाव दराने भाडेपट्टा करार वाढविण्यासाठी त्यांच्या इच्छेबाबत विचारणा केली होती (एप्रिल, २०१०) परंतु त्यांनी रुपये १०० प्रति चौ. फू. यापेक्षा जास्त दर देण्यास असमर्थता व्यक्त केली (मे, २०१०) होती व ती जागा ऑगस्ट २०१० पर्यंत मोकळी करून देतील असे कळविले होते.

महालेखाकारांच्या असे निदर्शनास आले (सप्टेंबर,२०११) की, ओएसएपीएल यांनी बाजार भाव दराने प्रदान करण्यास असमर्थता व्यक्त केली असताना महामंडळाने त्यांना कराराचा कालावधी संपल्यावर देखील जागा ताब्यात ठेवण्यास मुभा दिली होती. त्या दरम्यान महामंडळाने जागा भाड्याने देण्यासाठी निविदा मागवल्या होत्या (जुलै, २०१०) व त्यासाठी सहा देकार मिळाले होते (जुलै, २०१०) रुपये १३५ प्रति चौ. फू. दराचा जास्तीत जास्त किमतीचा मेसर्स कॉन्ट्रॅक्टर, नायक व किशनादवाला सांविधानिक लेखापाल यांचा होता.

पहिल्या कॉलमध्ये चांगला स्पर्धात्मक प्रतिसाद /दर मिळालेला असतानाही महामंडळाने दुसऱ्या कॉलचा निर्णय घेतला (ऑगस्ट,२०१०) व त्यानुसार मंडळाने बेंचमार्क असेट मॅनेजमेंट कंपनी प्रा.लि. बीएएमसीपीएल) यांचा रुपये १५२ प्रति चौ. फूटचा जास्तीत जास्त किमतीचा देकार स्वीकारण्याचा निर्णय घेतला (सप्टेंबर, २०१०) त्यांना त्वरित जागेचा ताबा द्यावयाचा होता पण महामंडळ तो देऊ शकले नाही. त्या दरम्यान ओसएपीएल यांनी त्यांच्याकडील जागेचा ताबा करार संपून चार महिन्यांचा कालावधी जाऊन देखील जुन्या दराने स्वतःकडे ठेवला (ऑक्टोबर, २०१० पर्यंत) दुसऱ्या बाजूला बीएएमसीपीएल यांनी त्यांचा देकार आता या जागेत स्वारस्य नाही असे

सांगून काढून घेतला (ऑक्टोबर, २०१०) महामंडळ अंतिमत: ही जागा कृष्णा व सौराष्ट्री असोसिएटस यांना रुपये १४० प्रति चौ. फू. दराने जुलै, २०११ पासून भाड्याने दिली व त्यांना तीन महिन्यांसाठी भाडे न घेता प्रदान केली. अशा रितीने भाड्याने देण्यासाठी पार्टीला अंतीमरुप देण्यामधील विलंबामुळे महामंडळाचे रुपये ७४.१४ लाखांचे नुकसान झाले.

व्यवस्थापनाने म्हटले होते (एप्रिल,२०१२) की, महामंडळाने जागा भाड्याने देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले होते परंतु ते वेळेत जागा भाड्याने देऊ शकले नाही. या महामंडळाच्या उत्तरास शासनाने दुजोरा दिला होता (मे,२०१२) हे उत्तर स्वीकारण्यायोग्य नव्हते कारण महामंडळ दोन वेळेस भाडेपट्टा कराराला अंतिमरुप देण्यात अपयशी ठरले होते व ओएसएपीएलला जागा चार महिन्यांच्या कालावधीसाठी जुन्या दराने वापरण्यास मुभा दिली होती.

२.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले आहे की, (१) सुरूवातीस आम्ही हे कळवू इच्छितो की, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ आणि ओमेगा शिपींग एजन्सीज प्रा.लि. यांच्यात भाडेपट्टा करार दिनांक ३० नोव्हेंबर, २००४ व दिनांक ३ डिसेंबर, २००४ रोजीचे पुरक पत्रानुसार सुरूवातीचा ३३ महिन्यांच्या कालावधी समाप्ती नंतर अनुज्ञाप्तिधारकाच्या विनंतीनुसार अनुज्ञाप्तीदाता सदर कराराचे नुतनीकरण पुढील ३३ महिन्याकरिता ठोक रक्कम रुपये १,७५,००० अधिक १० % वाढ म्हणजे रुपये १,९२,५०० एवढी भाडेवाढ ही जुन्या भाडेपट्टाकरारात बदल न करता भाडेपट्टा करार करण्यात आला होता. सदरचे करार पत्राची यापूर्वीच दिनांक ३० नोव्हेंबर,२००४ रोजी नोंदणी झाली होती. दिनांक ३० नोव्हेंबर,२००४ च्या नोंदणी झालेल्या करारानुसार सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर भाडेकरुच्या विनंतीनुसार मालकाने सदरचा करार पुढील ३३ महिन्यासाठी परस्परांना स्वीकृत असलेल्या अटी व शर्तीनुसार नुतनीकरार करण्याचा आहे.

(२) तथापि, अशा स्वरूपाचा दिनांक ३० नोव्हेंबर,२००४ व पुरक पत्र दिनांक ३ डिसेंबर, २००४ चा करार असूनदेखील महामंडळाने सन २००७ मध्ये भाडेकरु मे. ओमेगा शिपींग एजन्सीज प्रा.लि. यांच्याकडून सदरची जागा खाली करून घेण्याचे कसोशीचे प्रयत्न केले. या प्रक्रियेमध्ये २००७ मध्ये मे. ओमेगा शिपिंग एजन्सीज प्रा.लि. यांना जागा खाली करण्यासाठी कायदेशीर नोटीसा पाठविल्या. तथापि, मूळ भाडे करार दिनांक ३० नोव्हेंबर, २००४ व पुरक पत्र दिनांक ३ डिसेंबर, २००४ नुसार पुढील ३३ महिन्याच्या कालावधीसाठी ठरलेल्या ठोक रकमेच्या १० % वाढीव रकमेसह करार नुतनीकरणासाठी हक्कदार असल्याने मे. ओमेगा शिपींग एजन्सीज प्रा. लि.यांनी

सदरची जागा खाली करण्यास नकार दिला. यास्तव महामंडळाने सदर बाबीमध्ये ॲड. श्री. एन. पी. वागळे यांचे कायदेशीर मत घेतले. त्यांच्या मतानुसार सदरचा करार व नंतरचे पुरक पत्र नोंदणीकृत असल्याने महामंडळास त्यापासून माघार घेता येणार नाही. तसेच सदरच्या विधीतज्ञांने असेही सांगितले की, दिनांक ३० नोव्हेंबर, २००४ व पुरक पत्र दिनांक ३ डिसेंबर, २००४ मध्ये नमूद केलेल्या अटी व नियम लक्षात घेता महामंडळास भाडेपट्टा करार रद्द करता येणार नाही. यामध्ये महामंडळास करारातील तरतुदीनुसार जर महामंडळाकडे काही उचित गरज असल्यावरच मे. ओमेगा शिपींग एजन्सीज प्रा.लि. यांना सदरची जागा खाली करण्यासंबंधी सुचवू शकत होते. यासंबंधात ॲड. एन.पी. वागळे यांनी असेही स्पष्ट केले आहे की, जर महामंडळाने या संदर्भात भाडेकरू विरुद्ध महाराष्ट्र भाडे नियमन कायदयाखाली कायदेशीर कारवाई केली तर त्याचा निकाल लागण्यासाठी किमान तीन ते चार वर्षाचा कालावधी लागेल.

(३) उपरोक्त घटना व बाबीनुसार तसेच दिनांक ३० नोव्हेंबर,२००४ चा करार व पुरक पत्र दिनांक ३ डिसेंबर, २००४ हे वैध असल्याने तो करार महामंडळास विधीवत व बंधनकारक असल्यामुळे मे. ओमेगा शिपींग एजन्सीज प्रा.लि. यांच्या बरोबरचा भाडेपट्टा करार, जो दिनांक ३० जून, २०१० रोजी संपुष्टात आला, पुढील ३३ महिन्यासाठी १० % वाढीव रकमेसहीत चालू ठेवणे कायद्याने क्रमप्राप्त होते.

(४) मे. ओमेगा शिपींग एजन्सीज प्रा. लि. यांच्या सोबतचा भाडेपट्टा करार कालप्रवाहानुसार दिनांक ३० जून,२०१० रोजी संपुष्टात येणार होता त्यामुळे मे.ओमेगा शिपिंग एजन्सीज प्रा. लि. यांच्याकडे महामंडळाने आग्रह धरल्यानुसार जागा मोकळी करेल या अपेक्षेने महामंडळाने नविन भाडेकरू मिळण्यासाठी दिनांक १३ जुलै, २०१०, १८ ऑगस्ट, २०१०, २३ ऑक्टोबर, २०१० व २८ जानेवारी, २०११ अशा चार वेळा वृत्तपत्रामध्ये जाहिराती दिल्या. यापैकी माहे जुलै, २०१० मध्ये दिलेल्या जाहिरातीस मे. कॉन्ट्रॅक्टर, नायक आणि किशनादवाला, चार्टड अकांऊटंट यांच्या कडून रक्कम रुपये १३५ दर चौ. फूट प्रमाणे भाड्याचा प्रस्ताव प्राप्त झाला. परंतु जुलै २०१० मध्ये प्रचलित बाजारभाव प्रति चौ. फूट रुपये १५० ते २०० या दरम्यान होता. त्यामुळे चांगला प्रस्ताव मिळण्याच्या उदेशाने महामंडळाने ऑगस्ट २०१० मध्ये जाहिरात प्रसिद्ध केली तेव्हा मे. बेंच मार्क असेट मॅनेजमेंट कंपनी प्रा. लि. यांच्याकडून प्रति चौरस फूट रुपये १५२ या दराचा प्रस्ताव प्राप्त झाला व लगेचच सदरचा प्रस्ताव दिनांक०९ सप्टेंबर, २०१० रोजी संचालक मंडळाने जास्तीचा प्रस्ताव असल्याने स्वीकारला व त्याबाबत कंपनीस १३ सप्टेंबर, २०१० रोजी कळविण्यात आले.

कंपनीस असेही कळविण्यात आले की, सद्याच्या भाडेकरूने जागा मोकळी केल्यानंतर जागेचा ताबा देण्यात येईल. परंतु सदर कंपनीने यापूर्वीच दुसरी जागा शोधून ठेवली होती. त्यामुळे त्यांनी दिनांक ६ ऑक्टोबर, २०१० च्या पत्राद्वारे आपला देकार मागे घेतला. कंपनीने मागे घेतलेल्या त्यांच्या देकाराचे कारण हे भाडेकरूने जागा खाली केली नसल्यामुळे नसून सदर कंपनीने दुसरी पर्यायी जागा आधीच शोधून ठेवली होती. त्यामुळे त्यांच्या दिनांक ६ ऑक्टोबर, २०१० च्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे आपल्या प्रस्तावाचा पाठपुरावा करण्यात स्वारस्य दाखविले नाही. इथे नमूद करणे समर्पक होईल की, मागविलेले देकार हे फक्त चौकशीच्या स्वरूपाचे होते. त्यामुळे महामंडळाने प्रस्तावासाठी इसाराची रक्कम नसल्यामुळे प्रस्तावदारानी प्रस्ताव मागे घेतला तरी महामंडळ त्यांच्याविरोधात काही कारवाई करु शकत नव्हते.

(५) मे. ओमेगा शिपिंग एजन्सीज प्रा. लि. यांच्या बरोबरचा करार दिनांक ३० जून, २०१० रोजी संपला व प्रचलित दरानुसार भाडेपट्टा चालू न ठेवण्याबद्दल कंपनीला स्वारस्य नसल्याचे कळविल्यावर महामंडळाने त्यानंतर जागा मोकळी करून घेण्यासाठी तसेच प्रचलित दरानुसार नविन भाडेकरुशी करार करण्यासाठी प्रयत्न केले. परंतु नवीन प्रस्ताव येत नसल्यामुळे महामंडळापुढे मे. ओमेगा शिपींग एजन्सीज प्रा. लि. हे जागा मोकळी करत नसल्याने तसेच नविन करार भाडेपट्टा करण्यास तयार नसल्याने सदर भाडेकरुस चालू ठेवण्याशिवाय पर्याय उपलब्ध नव्हता. महाराष्ट्र भाडे नियमन कायद्यानुसार न्यायालयाच्या मध्यस्थी अभावी महामंडळ सक्तीने जागेचा ताबा घेऊ शकत नव्हती. कारण त्यासाठी जागा ताब्यात घेण्याबद्दलचे उचित कारण द्यावे लागणार होते. जेव्हा मे. बेंच मार्क असेट मॅनेजमेंट कंपनी प्रा.लि. या कंपनीने वरील उल्लेखलेल्या त्यांच्या दिनांक ६ ऑक्टोबर, २०१० च्या पत्राद्वारे प्रस्ताव माघारी घेतला तेव्हा महामंडळास लगेचच याबाबत पुढील कारवाही करणे भाग पडले. महामंडळाने पुन्हा २३ ऑक्टोबर, २०१० व २८ जानेवारी, २०११ रोजी जाहिराती दिल्या पण त्यास प्रतिसाद मिळाला नाही. महामंडळाने रियल इस्टेट एजन्ट/ब्रोकरना सुद्धा संपर्क साधला पण सदर इमारतीमध्ये पार्कीगसाठी जागा उपलब्ध नसल्यामुळे महामंडळास प्रस्ताव प्राप्त झाले नाहीत. सरतेशेवटी जून, २०११ मध्ये मे. कृष्णा ॲन्ड सौराष्ट्री यांचा प्रति चौ. फूट रुपये १४० चा आलेला प्रस्ताव संचालक मंडळाने मंजूर केला. सदरचा प्रस्ताव प्राप्त झाल्याबरोबर महामंडळाच्या संचालक मंडळाने सदर कंपनीस पूर्वतयारीसाठी तीन महिन्याचा कालावधी देऊन प्रस्ताव मंजूर केला. कारण सदरची कंपनी त्याशिवाय जागा भाड्याने घेण्यास तयार नव्हती व त्यामुळे जागा मोकळी राहण्याची शक्यता होती. त्यामुळे संचालक मंडळाने पूर्व तयारी करण्यासाठी तीन महिन्यांचा कालावधी मंजूर करण्याचा जाणीवपूर्वक निर्णय घेतला.

(६) उपरोक्त घटनाक्रम आणि प्राप्त परिस्थितीवरुन महामंडळ प्रकर्षाने जाणीव करून देऊ इच्छिते की, मे. ओमेगा शिपिंग एजन्सीज प्रा. लि. यांच्याशी दिनांक ३० नोव्हेंबर, २००४ व पुरक पत्र दिनांक ३ डिसेंबर, २००४ नुसार मे. ओमेगा शिपिंग एजन्सीज प्रा. लि. यांना दिनांक ३० जून, २०१० पर्यंत जागा वापरु देणे महामंडळास विधीवत बंधनकारक होते. आणि हा कालावधी संपल्याबरोबरच महामंडळाने जरुर जाहिराती दिल्या आणि प्रस्ताव मागविले परंतु आलेले प्रस्ताव हे तत्कालीन प्रचलित बाजारभावापेक्षा कमी दराचे होते. म्हणून महामंडळाने दुसऱ्यांदा, तिसऱ्यांदा तसेच चौथ्यांदा प्रचलित बाजारभावाने प्रस्ताव मिळतील या अपेक्षेने जाहिराती दिल्या. नविन प्रस्ताव येत नसल्याने या संक्रमणाच्या काळातच मे. ओमेगा शिपिंग एजन्सीज प्रा. लि. यांना चालू ठेवण्याशिवाय महामंडळापुढे पर्याय नव्हता. तसेच महाराष्ट्र भाडे नियमानुसार न्यायालयाच्या हस्तक्षेपाशिवाय महामंडळ भाडेकरुस सक्तीने बाहेर काढू शकत नव्हते. इथे असे म्हणणे उचित होईल की, महामंडळ हे सार्वजनिक उपक्रम असल्यामुळे प्रचलित बाजारभावाप्रमाणे भाडेकरु मिळविणे हे त्याचे कर्तव्य होते आणि पहिल्या वेळेस आलेले प्रस्ताव हे त्या भागात मिळणाऱ्या प्रचलित बाजारभावापेक्षा कमी होते. त्यामुळे महामंडळाने त्यानंतर तीन वेळा प्रस्ताव मागविले. अशा प्रकारे चांगले प्रस्ताव मिळण्यासाठी महामंडळाने त्या नंतर तीन वेळा जाहिराती दिल्या ही खरीखुरी कर्तव्य तत्परता होती व ती महामंडळाच्या हिताची होती. त्यामुळे नविन भाडेकरु मिळेपर्यंत मे. ओमेगा शिपिंग एजन्सीज प्रा. लि. यांच्याबरोबर त्यांचा हक्क प्रस्थापित न करता जुन्या दराने चालू ठेवण्याशिवाय महामंडळापुढे दुसरा पर्याय उपलब्ध नव्हता कारण, महाराष्ट्र भाडे नियमन कायद्यानुसार भाडेकरुस हुसकावून लावण्यासाठी दावा दाखल केला असता तर सदरची जागा चार ते पाच वर्षापर्यंत न्यायप्रविष्ठ झाली असती. तसेच जागा भाडेतत्वावर देणे हे राज्य वित्तीय महामंडळे कायद्यानुसार महामंडळाचे मुख्य कार्य तसेच उद्देश नव्हता. शिवाय याबाबत ना शासनाने तसेच तत्सम कार्यालयाने मार्गदर्शक तत्वे/ नियम घालून दिले आहेत.

म्हणून येथे आदरपुर्वक सादर करावयाचे आहे की, महामंडळाने चांगला प्रस्ताव स्वीकारण्यासाठी घेतलेला कालावधी तसेच वर नमुद केलेली याबाबतची पार्श्वभुमी याचा झालेल्या नुकसानीशी संबंध लावणे पर्याप्त होणार नाही. अशा परिस्थितीत महामंडळाने याबाबतीत सर्वतोपरी प्रयत्न केलेले आहेत. त्यामुळे लेखापरिक्षकानी निर्देशित केलेली नुकसानीची रक्कम ही वस्तुस्थितीशी धरून नाही.

२.३ याप्रकरणी शासनाने असे मत व्यक्त केले की, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ आणि मे. ओमेगा शिपींग एजन्सीज प्रा.लि. यांच्यात भाडेपट्टा करार दिनांक ३० नोव्हेंबर, २००४ व पुरक पत्र दिनांक ३ डिसेंबर, २००४ नुसार सुरूवातीचा ३३ महिन्यांच्या कालावधी समाप्ती नंतर अनुज्ञाप्तिधारकाच्या विनंतीनुसार सदर कराराचे नुतनीकरण पुढील ३३ महिन्याकरीता ठोक रक्कम रुपये १,७५,००० अधिक १०% वाढ म्हणजे रुपये १,९२,५०० एवढी भाडेवाढ ही जुन्या भाडेपट्टा करारात बदल न करता भाडेपट्टा करार करण्यात आला. सदर नोंदणीकृत करारानुसार सहा महिन्याचा कालावधी संपल्यानंतर भाडेकरुच्या विनंतीनुसार मालकाने सदरचा करार पुढील ३३ महिन्यांसाठी परस्परांना स्वीकृत असलेल्या अटी व शर्तीनुसार नुतनीकरार करणे आवश्यक होते.

तथापि, अशा स्वरुपाचा करार असूनदेखील महामंडळाने सन २००७ मध्ये भाडेकरु कंपनीकडून सदरची जागा खाली करून घेण्याचे कसोशीचे प्रयत्न केले तसेच कायदेशीर नोटीसा पाठविल्या. सदर कंपनीसोबतचा भाडेपट्टा करार कालप्रवाहानुसार दिनांक ३० जून २०१० रोजी संपुष्टात येणार असल्यामुळे महामंडळाने नविन भाडेकरु मिळण्यासाठी वेळोवेळी वृत्तपत्रामध्ये जाहिराती दिल्या. तथापि, प्राप्त झालेले प्रस्ताव हे तत्कालीन प्रचलित बाजारभावापेक्षा कमी दराचे होते. म्हणून महामंडळाने प्रचलित बाजारभावाने प्रस्ताव मिळतील या अपेक्षेने बऱ्याचजदा जाहिराती दिल्या.

नवीन प्रस्ताव येत नसल्याने या संक्रमणाच्या काळातच मे. ओमेगा शिपिंग एजन्सीज प्रा.. लि. यांना चालू ठेवण्याशिवाय महामंडळापुढे पर्याय नव्हता. माहे जुलै, २०१० मध्ये बाजरभावाप्रमाणे योग्य प्रस्ताव न मिळाल्याने महामंडळाने ऑगस्ट २०१० मध्ये जाहिरात प्रसिद्ध केली. तेव्हा मे. बेंच मार्क असेट मॅनेजमेंट कंपनी प्रा.लि. यांच्याकडून प्रति चौरस फूट रुपये १५२ या दराचा प्रस्ताव प्राप्त झाला व लगेचच सदरचा प्रस्ताव स्वीकारुन कंपनीस देकार कळविण्यात आले. परंतु सदर कंपनीने यापूर्वीच दुसरी जागा शोधुन ठेवली होती. त्यामुळे त्यांनी दिनांक ६ ऑक्टोबर २०१० च्या पत्राद्वारे आपला देकार मागे घेतला. यावरुन सदर कंपनीने मागविलेले देकार हे फक्त चौकशीच्या स्वरूपाचे होते. तसेच महामंडळाने प्रस्तावासाठी इसाराची रक्कम घेतली नसल्यामुळे प्रस्तावदारानी प्रस्ताव मागे घेतला तरी महामंडळ त्यांच्याविरोधात काही कारवाई करू शकले नाही.

महामंडळाने रियल इस्टेट एजन्ट/ब्रोकरना सुद्धा संपर्क साधला. परंतु, सदर इमारतीमध्ये पार्कींगसाठी जागा उपलब्ध नसल्यामुळे महामंडळास प्रस्ताव प्राप्त झाले नाहीत. सरतेशेवटी जून, २०११ मध्ये मे. कृष्णा ॲन्ड सौराष्ट्री यांची प्रति चौ. फूट रुपये १४० चा आलेला प्रस्ताव संचालक मंडळाने मंजुर केला. सदरचा प्रस्ताव प्राप्त झाल्याबरोबर महामंडळाच्या संचालक मंडळाने सदर कंपनीस पूर्वतयारीसाठी

तीन महिन्याचा कालावधी देऊन प्रस्ताव मंजुर केला. कारण, त्याशिवाय कंपनी जागा भाड्याने घेण्यास तयार नव्हती. प्रस्तृत प्रकरणी नमूद करण्यात येते की, महामंडळाने चांगला प्रस्ताव स्वीकारण्यासाठी घेतलेला कालावधी तसेच वर नमुद केलेली याबाबतची पार्श्वभुमीचा झालेल्या नुकसानीशी संबंध लावणे पर्याप्त होणार नाही. अशा परिस्थितीत महामंडळाने याबाबतीत सर्वतोपरी प्रयत्न केलेले असल्याचे दिसून येते.

२.४ समितीला उद्योग विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ३० सप्टेंबर,२०१५ रोजी उद्योग विभागाचे प्रधान सचिव, व इतर अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी महालेखाकारांनी केलेल्या लेखापरीक्षणामधील **परिच्छेद क्र. ३.२१ “ भाडेपट्ट्याला अंतिमरुप देण्यामध्ये विलंब ”** याबाबत घेतलेल्या आक्षेपासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी नमूद केले की, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ व मे. ओमेगा शिपींग एजन्सी प्रा.लि. यांचेबरोबरचा करार हा दिनांक ३० जून, २०१० मध्ये संपुष्टात येणार होता व त्यामुळे महामंडळाने नवीन भाडेकरु मिळण्यासाठी वेळोवेळी वर्तमानपत्रामध्ये जाहिराती दिल्या. तथापि, प्राप्त झालेले प्रस्ताव हे तत्कालीन प्रचलित बाजारभावापेक्षा कमी दराचे होते. तसेच, माहे जून २०११ मध्ये मे. कृष्णा ॲन्ड सौराष्ट्री यांचा १४० रुपये प्रति चौ. फूट प्रस्ताव महामंडळास प्राप्त झाला व तो संचालक मंडळाने मंजूर केला होता.

त्यासंदर्भात समितीने विचारणा केली की, भाडेपट्टा करार संपण्यापूर्वी ३-४ महिने अगोदर नवीन भाडेकरू मिळण्यासाठीची कार्यपद्धती का सुरू करण्यात आली नाही. त्यानुषंगाने विभागीय प्रतिनिधींनी नमूद केले की, काही वेळा करार झालेल्या भाडेकरुनांच दर वाढवून भाडेपट्टा करार पुढे सुरू ठेवण्यात येतो. सदर प्रकरणी महामंडळाने करार असताना देखील कंपनीस सन २००७ मध्ये जागा खाली करून घेण्याबाबत कायदेशीर नोटीस दिली होती. त्यामुळे यासंदर्भात कायदेशीर सल्ला घेतल्यानंतर असे लक्षात आले की, जर कंपनीने महामंडळाच्या विरोधात दावा दाखल केला तर तो निकाली निघण्यासाठी ५-६ वर्षाचा कालावधी गेला असता व जुन्या दरानेच महामंडळास भाडे मिळेल. त्यामुळे त्यावेळी महामंडळाने निर्णय मागे घेतला होता. सदर कंपनीस त्यावेळी प्रति चौ.फुट २०० रुपयांची ऑफर महामंडळाकडून देण्यात आली होती परंतु ती त्यांनी मान्य केली नाही. सदर कंपनीने १०० रुपये प्रति चौ.फुट दराची केलेली मागणी ती मान्य केली असती तर महामंडळाचे जवळपास ९० लाख रुपयांचे नुकसान झाले असते.

(शा.म.मु.) एचबी १५३३—३ (६५०—१२-२००५)

## २.५ अभिप्राय व शिफारस :—

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी लेखा परिक्षणाच्या वेळी महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाच्या कामकाजासंदर्भात परिच्छेद क्र. ३.२१ " भाडेपट्ट्याला अंतिमरुप देण्यामध्ये विलंब " या शिर्षकाखाली नोंदविलेल्या आक्षेपावर समितीने साक्ष घेतली साक्षीच्या वेळी असे आढळून आले की, भाडेपट्टा कराराला अंतिमरुप देण्यात विलंब केल्यामुळे महामंडळाला रुपये ७४.१४ लाखाचे नुकसान झाले आहे. महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ आणि मे. ओमेगा शिपींग एजन्सी प्रा. लि. यांच्यामध्ये ५२ रुपये प्रति चौ.मीटर दराने भाडेपट्टा करार झाला होता कराराची मुदत दिनांक ३० जून, २०१० पर्यंत होती. त्यामुळे महामंडळाने नवीन भाडेकरु मिळण्यासाठी वेळोवेळी वर्तमानपत्रामध्ये जाहिरातीही दिल्या. परंतु ऐन वेळी महामंडळाने जाहिराती दिल्यामुळे जास्त दराचे प्रस्ताव महामंडळास प्राप्त होऊ शकले नाही. यावरुन असे निदर्शनास येते की, **भाडेपट्टा करार संपण्यापूर्वी ३-४ महिने अगोदर महामंडळाने नवीन भाडेकरू मिळण्यासाठी कार्यपद्धती सुरू करणे आवश्यक होते.**

**तसेच मे.ओमेगा शिपिंग एजन्सी प्रा. लि. यांनी दिनांक ३० जून २०१० मध्ये महामंडळासोबतचा भाडेपट्टा प्रचलित दरानुसार चालू न ठेवण्याबद्दल कंपनीला स्वारस्य नसल्याचे महामंडळाला कळविले होते मे.ओमेगा शिपिंग एजन्सी प्रा.लि. यांनी बाजारभाव दराने भाडेपट्टा प्रदान करण्यास असमर्थता व्यक्त केली असतांनाही महामंडळानी त्या कंपनीचा कराराचा कालावधी संपल्यावरही देखील जागा ताब्यात ठेवण्यास कंपनीला मुभा दिली होती हे समितीस समर्थनीय वाटत नाही. त्यांनतर महामंडळाने मे. कृष्णा व सौराष्ट्री असोसिएटस यांना रुपये १४० प्रति चौ. फूट दराने जुलै, २०११ पासून जागा भाड्याने दिली होती त्या संस्थेकडूनही ३ महिन्यांचे भाडे न घेता ती जागा प्रदान करण्यात आली. त्यासंदर्भात जागा मोकळी राहण्याची शक्यता होती म्हणून सदर कालावधी मंजूर करण्यात आला होता. हे महामंडळाने दिलेले उत्तर समितीस समर्थनीय वाटत नाही. ह्या दोन्ही प्रकरणी झालेले नुकसान भरून काढण्यासाठी महामंडळाने कोणता निर्णय घेतला आहे याबाबतची माहिती समितीला सादर करावी.** तसेच अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून महामंडळाने गांभीर्याने दखल घ्यावी, अशी समिती शिफारस करीत आहे. तसेच याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावी.

## "महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ"

## (सन- २००९-२०१०)

**तीन - सेवा कराची कमी वसुली.— (महामंडळाने तात्पुरत्या कराराद्वारे पुरविलेल्या बसेसकडून गोळा केलेल्या आकारामधून जादा रकमेचे अल्पकरण केल्यामुळे रुपये १.०९ कोटी सेवा कराची कमी वसुली केली होती).**

**३.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००९-१० च्या प्रकरण क्रमांक ३ मधील परिच्छेद क्रमांक ३.१७ मध्ये "सेवा कराची कमी वसुली" या संदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले होते की, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (महामंडळ) प्रवासी वाहतुकीसाठी निरनिराळ्या स्वारस्य असलेल्या व्यक्तिंना व संस्थांना जसे की, व्यक्ती, शाळा, महाविद्यालये, अर्ध निमशासकीय संघटना इत्यादींना नैमित्तीक करारावर (सीसी) बसेस पुरविते. सन २००८ मध्ये दुरुस्त केलेल्या वित्त कायदा, १९९४ च्या कलम ६५ (११५) मध्ये "टूर ऑपरेटरच्या" दिलेल्या व्याख्येमध्ये एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करण्यासाठी उपलब्ध केलेल्या सेवांचा समावेश होतो. त्यामुळे, महामंडळाच्या सर्व विभागांचा टूर ऑपरेटरच्या व्याख्येत समावेश झाल्याने १२.३६ टक्के सेवा कर व शैक्षणिक उपकर देण्यास ते बांधिल झाले आहेत. विविध व्यक्ती संघटनांना नैमित्तिक करारावर पुरविलेल्या बसेसच्या भाड्यावर अनुमुल्य सूट देऊन (सूट पत्रकात जाहिर केल्याप्रमाणे) लागू असलेल्या दराने सेवा कर गोळा करावयाचा होता. भारत सरकारच्या २३ ऑगस्ट,२००७ च्या नोटफिकेशन प्रमाणे गोळा केलेल्या सेवाकरामध्ये ७५ टक्के सवलत टूर ऑपरेटरने कुठल्याही व्यक्तीला दिलेल्या वा देऊ केलेल्या "पॅकेज टूर" वर दिली होती. परंतु यासाठी टूर ऑपरेटरने जारी केलेल्या देयकांमध्ये अशा टूरचे शुल्क सर्व समाविष्ट असल्याचा उल्लेख करणे आवश्यक होते. ज्या प्रकरणांत केवळ वाहतूक सेवा पुरविण्यात येते त्या प्रकरणात गोळा केलेल्या भाड्याच्या ६० टक्के रकमेवरच सुट अबेटमेंट उपलब्ध होती व १२.३६ टक्के दराने सेवाकर वसूल करावयाचा होता. मार्च, २००९ पासून सेवाकराचा दर १२ टक्क्यावरुन १० टक्के इतका कमी झाला होता.

लेखापरीक्षणात असे आढळून आले (ऑगस्ट,२००९) की, दिनांक ४ जून, २००८ रोजी सर्व प्रादेशिक व्यवस्थापक व विभागीय नियंत्रकांना चुकीचे निर्देश जारी केले गेले त्यानुसार एकूण प्रवास भाड्याच्या ७५ टक्के रकमेवर सूट घेऊन अबेटमेंट उर्वरित २५ टक्के प्रवास भाड्यावर १२.३६ टक्के दराने सेवा कर गोळा करण्यास सांगण्यात आले. वस्तूतः ६० टक्के सूट अबेटमेंट घेऊन

४० टक्के प्रवास भाड्यावर सेवा कर आकारावयास हवा होता. चुकीच्या सुचनेमध्ये ५ मार्च २००९ ला सुधारणा करण्यात आली व संशोधित सूचनांप्रमाणे एकूण प्रवासी भाड्याच्या २५ टक्क्यांऐवजी ४० टक्के भाड्यावर सेवा कर आकारण्याचे निर्देश दिले गेले. (जून, २००८) ३१ विभागांकडून संकलित करण्यात आलेल्या माहितीवरुन असे उघड झाले की, एप्रिल, २००८ ते फेब्रुवारी, २००९ या कालावधीत प्रवासी वाहतुकीसाठी विविध व्यक्ती व संघटनांना नैमित्तिक करार पद्धतीने बसेस पुरवून विभागांनी रुपये ५४.१६ कोटी प्रवासी भाड्यापोटी कमविले होते. परंतु सेवाकराची वसुली करताना एकूण प्रवासी भाड्याच्या ७५ टक्के रकमेवर सूट घेऊन केवळ उर्वरित २५ टक्के प्रवास भाड्यावरच सेवा व शैक्षणिक कर रुपये १.५२ कोटी संकलीत करून अदा करण्यात आला, कायद्याप्रमाणे अनुमुल्य ६० टक्के सूट लक्षात घेऊन ४० टक्के प्रवासी भाड्यावर सेवाकर व शैक्षणिक कराची रक्कम रुपये २.६१ कोटी देय होते. परिणामस्वरुप वर्ष २००८-०९ मध्ये नैमित्तिक करारावर पुरविलेल्या बसेसच्या प्रवासी भाड्यावर सेवा व शैक्षणिक कराची रुपये १.०९ कोटींची कमी आकारणी केली गेली.

व्यवस्थापनाने आपल्या उत्तरात (जून, २०१०) सेवाकर व उपकराची २००८-०९ या कालावधीत कमी वसुली केली गेल्याचे मान्य केले. विभागीय कार्यालयांना संबंधित व्यक्ती व संघटनांकडून कमी गोळा करण्यात आलेला सेवाकर व उपकर वसूल करण्यासाठी सूचना दिल्या गेल्या असल्याचे पण उत्तरात पुढे सांगण्यात आले होते. शासनाने महामंडळाच्या उत्तरास दुजोरा देत सहमती दर्शविली होती व म्हटले (नोव्हेंबर २०१०) होते की, नैमित्तिक करारापोटी मिळालेल्या प्रवासी भाड्यावर कमी आकारल्या गेलेल्या सेवा व शिक्षण उपकराची वसुली करण्याच्या सूचना दिल्या गेल्या. वसुलीची शक्यता अंधूक दिसत आहे. कारण नैमित्तिक कराराच्या बऱ्याचशा प्रकरणात प्रवासीभाडे पूर्णपणे अगोदरच वसूल केले गेले होते, महामंडळाने पण ही वस्तुस्थिती मान्य केली होती. म्हणून शिफारस करण्यात येते की, चुकीच्या सूचना निर्गमित करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्याशिवाय नैमित्तिक करार सेवेपासून मिळालेल्या महसुलावर योग्य दराने सेवा व उपकर लावावा. जेणेकरून भविष्यात कमी कर गोळा झाल्याची प्रकरणे पुन्हा घडणार नाहीत.

**३.२** याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले आहे की, महामंडळाने दिनांक ४ जून २००८ रोजी नैमित्तिक कराराचे उत्पन्नावर ६०% सूट घेऊन ४०% रकमेवर निर्धारित दराने सेवाकर भरण्याऐवजी ७५% सूट घेऊन २५% रकमेवर सेवाकर भरण्याच्या सूचना विभागांना दिल्या व सदर सुचनेंमुळे सेवा कराची कमी वसुली झाली यावर आधारित शासकीय आक्षेप उपस्थित करण्यात आलेला आहे.

महामंडळाने नैमित्तिक कराराचे उत्पन्न सेवाकराचे कक्षेत येते किंवा कसे. याबाबत सेवाकर खात्याचे Tour Operator Service budget changes २००८-०९ चा पुनःश्च अभ्यास केला असता महामंडळ प्रामुख्याने प्रवासी टप्पा वाहतूक करते व प्रसंगी टप्पा वाहने शैक्षणिक संस्थांना, खाजगी व्यक्तींना लग्न समारंभ, शासनास आवश्यकतेनुसार कायदा व सुव्यवस्थेसाठी, निवडणूक, इत्यादी कारणांसाठी प्रसंगानुरूप बसेस पुरविते व त्यापासून मिळालेल्या उत्पन्नावर शासनाने निर्धारित केलेल्या दराने प्रवासी कर भरते. हे विचारात घेता वरील उत्पन्न सेवाकराच्या कक्षेत येत नाही. सेवाकर हा शासन अधिसुचनेनुसार पर्यटक तसेच कंत्राटी परवान्यावर चालविण्यात येणाऱ्या वाहनांद्वारे मिळालेल्या उत्पन्नावर देय आहे. त्या अनुषंगाने महामंडळाने संचालक, सेवाकर यांचेकडे पत्र क्रमांक ST/TD/GEN/८८/Service Tax/१२९५ दिनांक ७ मार्च, २०१२ अन्वये वस्तुस्थिती कळवून मार्गदर्शन मागितले आहे. पुढे येथे नमूद करण्यात येते की, या बाबत कर्नाटक राज्यामध्ये विविध महामंडळांकडून पुरविण्यात येणाऱ्या नैमित्तिक करारावरील बसेसच्या उत्पन्नावर देखील सेवाकर टप्पा वाहने नैमित्तिक करारासाठी पुरविली असल्याने अदा करीत नाहीत ही वस्तुस्थिती निदर्शनास आली आहे.

तसेच विभाग नियंत्रक, म.रा.मा.प. महामंडळ, सिंधुदुर्ग व रत्नागिरी यांनी नैमित्तिक करारावर शैक्षणिक संस्थांना पुरविलेल्या बसेसच्या उत्पन्नावर सेवा कराची मागणी नोटीसला सह आयुक्त, अबकारी कर, कोल्हापूरला दिलेले स्पष्टीकरण अतिरिक्त आयुक्त, अबकारी कर, कोल्हापूर यांनी आदेश क्रमांकः ०७/ST/ADC/KOP/१०, दिनांक २४ मार्च २०१० व ०८/ST/ADC/KOP/१०, दिनांक २४ मार्च २०१० अन्वये फेटाळल्यानंतर अबकारी कर आयुक्त (अपिल), पुणे-II यांचेकडे अपिल सादर केले होते. सदर अपिलावर आदेश क्रमांक F. No. V२PII (ST) ९४ आणि ८८/२०१०/४५२/अन्वये निकाल देताना निकाल पत्रात नमूद केले आहे की, स्थानिक शैक्षणिक संस्थांना शैक्षणिक सहलीसाठी नैमित्तिक करारावर पुरविलेल्या बसेसवर सेवाकराची मागणी केली आहे.

महामंडळाने सादर केलेल्या माहितीवरुन स्पष्ट होते की शाळा/महाविद्यालये यांनी शैक्षणिक सहलीसाठी बसेस नैमित्तिक करारावर घेतल्या होत्या. " टूर ऑपरेटर " तसेच " रेन्ट-अ-कॅब ऑपरेटर" या संज्ञेमध्ये शैक्षणिक संस्थांनी कमर्शियल ट्रेनिंग किंवा कोचिंग सेंटर जे कौशल्य व ज्ञान पाठ किंवा कुठल्याही विषयावर संबोधन करतात ते वगळून आयोजित केलेल्या शैक्षणिक सहलीचा समावेश होत नाही. त्यामुळे या संदर्भात शैक्षणिक संस्थांना नैमित्तिक करारावर दिलेल्या बसेसबाबत सेवाकराची मागणी कायदेशीर नाही.

वरील निकालपत्राचा निर्णय विचारात घेता शैक्षणिक संस्थांना शैक्षणिक सहलीसाठी पुरविलेल्या बसेस सेवाकराच्या कक्षेत येत नाहीत. नैमित्तिक करारापासून मिळालेल्या एकूण रुपये ५४.१६ कोटी उत्पन्नापैकी रुपये १७.०५ कोटी रक्कम शैक्षणिक संस्थाना पुरविलेल्या बसेसची आहे.

अबकारी कर आयुक्त (अपिल), पुणे-II यांनी दिलेल्या निकालपत्रानुसार शैक्षणिक संस्थांना शैक्षणिक सहलीसाठी पुरविलेल्या बसेसपासून मिळालेल्या रुपये १७.०५ कोटी उत्पन्नावर सेवाकर देय होत नाही. शैक्षणिक संस्थांना शैक्षणिक सहलीसाठी पुरविलेल्या बसेसच्या उत्पन्नावर ७५% सवलत घेऊन २५% बिलाच्या रकमेवर भरण्यात आलेल्या सेवाकराची रक्कम रुपये ५२.६९ लाख होते. [ रुपये १७.०५ कोटी शैक्षणिक संस्थांना नैमित्तिक करारावर पुरविलेल्या बसेसपासून मिळालेले उत्पन्न x २५% (७५% सवलत विचारात घेऊन) x १२.३६% (सेवा कर) + शैक्षणिक कर + उच्च माध्यमिक शिक्षण कर) = रुपये ५२.६९ लाख. ]

परिच्छेदामध्ये नैमित्तिक करारावर पुरविलेल्या बसेससाठी रुपये ५४.१६ कोटी महसूल प्राप्त झाला असे नमूद केले आहे. हे जरी खरे असले तरी देखील नैमित्तिक कराराची संपूर्ण देयके त्या-त्या महिन्यात निकाली निघत नाहीत, त्यामुळे सेवाकराची रक्कम त्या-त्या महिन्यात मिळालेल्या उत्पन्नावर देय होत नाही. देयके ज्याप्रमाणे निकाली निघतात त्याप्रमाणे त्या-त्या महिन्यात सेवाकर देय होतो. त्यामुळे वरील १ एप्रिल, २००८ ते २८ फेब्रुवारी, २००९ कालावधीमध्ये निकाली निघालेल्या नैमित्तिक कराराच्या बिलाची रक्कम रुपये ४६.७४ कोटी इतकी येते त्यावर ७५% सूट घेऊन २५% रकमेवर रुपये १.५१ कोटी सेवाकर महामंडळाने सेवाकर विभागास भरला आहे.

वरीलप्रमाणे जरी वस्तुस्थिती असली तरी शासकीय लेखा परिच्छेद विचारात घेऊन दिनांक ५ मार्च, २००९ च्या परिपत्रकान्वये सर्व विभागांना कमी वसूल करण्यात आलेल्या सेवाकराची रक्कम संबंधित पार्टीकडून वसूल करून सेवाकर खात्यास भरण्याच्या सूचना देण्यात आल्या.

प्रादेशिक कार्यालयाकडून मागविण्यात आलेल्या माहितीवरुन असे दिसून आले आहे की, दिनांक ५ मार्च, २००९ च्या परिपत्रकान्वये दिलेल्या सुचनेनुसार विभागांनी रुपये १६,९२,५९१ सेवाकराच्या फरकाची रक्कम वसूल करून शासनास भरली आहे.

तथापि शासकीय लेखा परिच्छेदामुळे महामंडळाने यापुर्वीच दिनांक ५ मार्च,२००९ रोजी वरील विषयाच्या सूचना सुधारित करून नैमित्तिक कराराच्या बिलांवर ७५% ऐवजी ६०% सवलत घेऊन सेवाकर आकारुन शासनास भरण्याच्या सूचना विभागांना दिल्या आहेत. महासंचालक, सेवाकर, यांना वर नमूद केलेल्या पत्राप्रमाणे मागविण्यात आलेले मार्गदर्शन प्राप्त झाल्यानंतर सदर प्रकरणी योग्य कार्यवाही करण्यात येईल.

३.३ याप्रकरणी शासनाने असे मत व्यक्त केले की, महासंचालक सेवाकर यांचेकडून अभिप्राय प्राप्त झाल्यावर महामंडळास त्यानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येतील.

३.४ समितीला परिवहन विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ८ सप्टेंबर, २०१५ रोजी परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव, तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी महालेखाकारांनी केलेल्या लेखापरीक्षणामधील **परिच्छेद क्र. ३.१७ “ सेवा कराची कमी वसुली ”** याबाबत घेतलेल्या आक्षेपासंदर्भात समितीने विचारले असता, याबाबत विभागीय सचिव यांनी नमूद केले की, दिनांक ५ मार्च,२००९ पासून शैक्षणिक सहलींसह इतर सर्व बाबींच्या सेवा कराचा भरणा करण्यात आला आहे. सन २००९-१० ते २०१४-१५ पर्यंत प्रासंगिक करारापोटी रुपये १४५.३८ कोटी यातील उत्पन्न मिळालेले आहे व त्यावर ६०% सवलत वगळता ५८.९५ कोटी (४०% प्रमाणे) उत्पन्नावर रुपये ७.१९ कोटी सेवाकर भरणा केलेला आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने सन २००९-१० ते २०१४-१५ पर्यंत शैक्षणिक सहल प्रासंगिक करारावर अनुज्ञेय नसलेला रुपये ७,१८,७६,०००/- सेवाकर अदा केलेला आहे व अनुज्ञेय नसलेला रुपये ७,१८,७६,०००/- करातून रुपये २०,४२,२५९/- ही सेवाकर रक्कम वगळता संबंधित सेवाकर विभागाकडून महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाला रुपये ६,९८,३३,७४१/- परतावा देय ठरतो त्यानुसार संबंधित विभागाकडे परतावा दावा (रिफंड क्लेम) दाखल करण्यात येत आहे.

यावर समितीने विचारले की, महामंडळाने प्रवाशांकडून चुकीच्या पद्धतीने सेवाकराचे पैसे वसूल करण्यांत आले आहेत. त्यामुळे हे पैसे प्रवाशांना परत कसे करणार याबाबतचा खुलासा महामंडळ समाधानकारकरित्या करू शकले नाही. कारण हे पैसे शैक्षणिक संस्थांनी सेवा करापोटी त्या शैक्षणिक संस्थेतील विद्यार्थ्यांकडूनच घेतले आहेत. त्या संस्थांचा हिशेब महामंडळाकडे जरी उपलब्ध असला तरी त्यामुळे महामंडळाने सेवा करासंदर्भात अवलोकन न करता वसुली करणे ही

अतिशय गंभीर बाब आहे. रत्नागिरी कार्यालयाने ज्याप्रमाणे सेवा कर भरू नये असे आव्हान केले होते. वास्तविक पाहता ही जबाबदारी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक आणि संपूर्ण विभागाची होती. रत्नागिरी कार्यालयाने सेवा कराच्या बाबतीत हरकत घेतली म्हणून महामंडळाने त्यांचे उदाहरण समितीसमोर देत असताना या प्रकरणी महामंडळाने संबंधित प्राधिकरणाकडे दाद मागणे आवश्यक होते.

सेवाकर विभागाकडून महामंडळाद्वारे जेंव्हा स्पष्टीकरण मागविले जाते त्यावेळी सेवाकर लागू आहे की नाही हे समजते. याबाबत माहिती पुस्तिकेत नमूद केले आहे की, कर्नाटक सरकार सेवाकर देतच नाही. सदर कायदा केंद्र सरकारचा कायदा असल्यामुळे एक राज्य सरकार हा कर देते आणि दुसरे राज्य सरकार कर देत नाही यासंदर्भात महामंडळाने खुलासा करावा. यावर विभागीय सचिवांनी असे मत मांडले की, सेवाकर कार्यालयाच्या तीन स्तरावरील अधिकाऱ्यांनी या संदर्भातील निर्णय देत असताना वेगवेगळ्या प्रकारची भूमिका घेतली आहे. महामंडळाच्या रत्नागिरी व सिंधुदुर्ग विभागाच्या सेवाकर रक्कम वसुलीसंबंधीच्या प्रकरणी अतिरिक्त आयुक्त, केंद्रीय उत्पादन शुल्क, कोल्हापूर (Commissioner of Central Excise, Kolhapur) यांनी दिनांक २४ मार्च, २०१० रोजी दिलेल्या निकालात राज्य परिवहन रत्नागिरी व सिंधुदुर्ग विभागीय कार्यालयाने कायद्याचे केलेले विवेचन बरोबर नाही, अशी भूमिका घेतली होती त्या निकालाविरोधात आयुक्त (अपील-II), केंद्रीय उत्पादन शुल्क, पुणे (Commissioner Appeal II, Central Excise, Pune) यांच्याकडे करण्यात आलेल्या अपिलात मात्र महामंडळाचे अपिल मान्य करून पूर्वी दिलेला आदेश रद्द करण्यात आला. त्यानंतर महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयाने केंद्रीय उत्पादन शुल्क मुख्य कार्यालयाला पत्र लिहिले असता त्यांनी असे उत्तर पाठविले की, प्रथमदर्शनी असे दिसून येते की, सेवा कर लागू नाही. तथापि, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयाने संबिधित प्राधिकाऱ्यांकडे अपील करून आपली बाजू मांडावी.

### ३.५ अभिप्राय व शिफारस :—

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी लेखा परिक्षणाच्या वेळी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कामकाजासंदर्भात परिच्छेद क्र. ३.१७ "सेवा कराची कमी वसुली" या शिर्षकाखाली नोंदविलेल्या आक्षेपावर समितीने साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीच्या असे निदर्शनास आले की, महामंडळाच्या रत्नागिरी कार्यालयाने जशी मागणी केली तशी मागणी इतरांनी केली नाही. **वास्तविक पाहता सेवा कराची रक्कम ही उचल स्वरूपातील नाही. या बाबीची दखल महाराष्ट्र राज्य**

मार्ग परिवहन महामंडळाने घ्यावयास पाहिजे होती. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ रत्नागिरीसाठी वेगळी आणि इतरांसाठी वेगळी सवलत देऊ शकत नाही. एका ठिकाणी सूट दिली आणि दुसऱ्या ठिकाणी सूट दिली नाही, असे होऊ शकत नाही.

शैक्षणिक प्रयोजनासाठी वापर झाला असेल तर सेवाकर लागू होत नाही, असे सेवाकर कार्यालयाने स्पष्ट केले असतानाही महामंडळाने सेवाकर भरावयाची आवश्यकता नव्हती शैक्षणिक प्रयोजनासाठी सेवाकर लागू होत नाही, अशा प्रकारचा आदेश मिळाल्यानंतरही तो कर महामंडळाने भरण्याचे सुरू ठेवले आहे, याबाबत महामंडळाने जो खुलासा केला आहे, तो समर्थनीय नाही. महामंडळाने केवळ एका पत्रान्वये सेवाकर संदर्भातील मार्गदर्शन त्या विभाग प्रमुखांकडे मागितले आहे. त्याऐवजी महामंडळाने अपील करावयास हवे होते आणि जोपर्यंत अपीलाचा निर्णय लागत नाही तोपर्यंत कर भरण्याचे थांबवावयास हवे होते. निर्णय महामंडळाच्या विरुद्ध लागला असता तर पैसे भरता आले असते आणि निर्णय बाजूने लागला असता तर पैसे भरण्याचा प्रश्न उद्भवला नसता. सन २००९ पासून आतापर्यंत महामंडळाने जो सेवाकर भरला आहे, तो भूतलक्षी प्रभावाने परत मिळण्याबाबत महामंडळाने कोणती कार्यवाही केली आहे याबाबतची माहिती समितीला प्राप्त होणे आवश्यक आहे. राज्य परिवहन रत्नागिरी विभागीय कार्यालयाऐवजी राज्य परिवहन मध्यवर्ती कार्यालय म्हणून या बाबीचा केंद्रीय कार्यालयाने पाठपुरावा केला असता तर महामंडळाचे नुकसान झाले नसते, ही बाब यामधुन उघड झाली आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या तत्कालिन व्यवस्थापकीय संचालकांनी अत्यंत बेजबाबदारपणे हे प्रकरण हाताळल्याचे दिसून येते त्यामुळे यापुढे व्यवस्थापकीय संचालकांनीच ह्या संपूर्ण प्रकरणाचा सुयोग्यरित्या पाठपुरावा करावा व भविष्यात या संदर्भात राज्य परिवहन मध्यवर्ती कार्यालयाने योग्य ती दक्षता घ्यावी आणि निकष निश्चित करावेत, या सर्व प्रकरणाची गांभीर्याने नोंद घ्यावी, अशी सूचना ही समिती करीत आहे. तसेच याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत अवगत करावी.

# बैठकींचे परिशिष्ट

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक बुधवार, दिनांक ३० सप्टेंबर २०१५ रोजी दुपारी २-०० वाजता, कक्ष क्रमांक २००१, विसावा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते :-

उपस्थिती

१. डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

३. डॉ. आशिष देशमुख, वि.स.स.

४. ॲड. आकाश फुंडकर, वि.स.स.

५. श्री. अमित साटम, वि.स.स.

६. श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

७. ॲड. यशोमती ठाकूर, वि.स.स.

८. श्री. भारत भालके, वि.स.स.

९. श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.

१०. श्री. बळीराम सिरसकर, वि.स.स.

११. श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव,

(२) श्री. श्री. चु. श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ. (लेखा)

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव.

महालेखाकार कार्यालय, मुंबई :

श्रीमती संगीता चौरे, प्रधान महालेखाकार.

विभागीय प्रतिनिधी :

श्री. अपूर्व चंद्रा, प्रधान सचिव, उद्योग विभाग.

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००९-१० व २०११-१२ च्या वाणिज्यिक अहवालातील "महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ" यांच्या परिच्छेदासंबंधित विभागीय सचिवांची तथा इतर अधिकारी यांची साक्ष घेतली.

**सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक मंगळवार, दिनांक ८ सप्टेंबर, २०१५ रोजी दुपारी २-०० वाजता, कक्ष क्रमांक १९०१, एकोणिसावा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते :-**

**उपस्थिती**

१. ॲड. अनिल परब, वि.प.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

२. श्री. भिमराव धोंडे, वि.स.स.

३. श्री. मनोहर भोईर, वि.स.स.

४. श्री. भारत भालके, वि.स.स.

५. श्री. पंकज भुजबळ, वि.स.स.

६. श्री. हितेंद्र ठाकूर, वि.स.स.

७. श्री. बळीराम सिरसकर, वि.स.स.

८. श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव,

(२) श्री. श्री. चुं. श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ. (लेखा)

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव.

**महालेखाकार कार्यालय, मुंबई :**

श्रीमती संगीता चौरे, प्रधान महालेखाकार.

**परिवहन विभाग :**

१. श्री. गौतम चटर्जी, अपर मुख्य सचिव.

२. श्री. साबळे, उप सचिव.

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ :**

१. श्री. संजय खंदारे, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक.

२. श्री. एकनाथ मोरे, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी.

३. कॅ. विनोद रत्नपारखी, महाव्यवस्थापक.

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००९-१० च्या वाणिज्यिक अहवालातील " महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ " यांच्या परिच्छेदासंबंधित विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक मंगळवार, दिनांक २४ नोव्हेंबर, २०१५ रोजी विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस पुढीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते :-

## उपस्थिती

१. डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

३. डॉ. आशिष देशमुख, वि.स.स.

४. श्री. मनोहर भोईर, वि.स.स.

५. श्री.अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

६. श्री. बळीराम सिरसकर, वि.स.स.

७. श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स.

८. श्री. अनंत गाडगीळ, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव.

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव.

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी.

समितीने प्रारूप अहवालाच्या मसुद्यांवर विचार करून तो काही सुधारणांसह संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई